आहेत.

आरोपातून मुक्त झाली, असेही ते म्हणाले.

# दिवाळीपर्यंत सोने होईल ३२ हजारी



**मुंबई :** येत्या दिवाळीत सोन्याचा दर दहा ग्रॅमसाठी रु. ३२ हजारांची विक्रमी पातळी गाठेल, असा अंदाज मुंबईतील सुवर्ण व्यापारी संघटना 'बॉम्बे बुल्यन असोसिएशन'चे अध्यक्ष पृथ्वीराज कोठारी यांनी व्यक्त केला आहे. यामुळे गोरगरीबांसाठी सुवर्णस्पर्श आता स्वप्नवत होण्याची शक्यता बळावली आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे सुरक्षित गुंतवणुकीसाठी गुंतवणूकदार सोन्याला प्राधान्य देतील. परिणामी, सोने महाग होईल, असे कोठारी यांचे मत आहे.

सिरियातील नागरी युद्ध आणि इराणमधील राजकीय तणाव सोन्याचा दर वाढवण्यास प्रामुख्याने जबाबदार असतील. आधीच भडकलेल्या किमतीमुळे भारतात किरकोळ सोन्याची खरेदी घटली असली तरी या जागतिक कारणांमुळे सोन्याचा दर सतत वाढत राहील. दुसरीकडे अमेरिकेने अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी तिसऱ्या टप्प्यातील सुधारणा केल्या, तर तेथेही सोन्याचा दर भडकण्याची शक्यता आहे. वर्तमान वर्षाच्या सुरुवातीपासूनच सोन्याचा भाव वधारू लागला होता. भारतातदेखील गुंतवणूकदार आरबीआयच्या धोरणाकडे डोळे लावून बसले आहेत. आरबीआयने अर्थव्यवस्था सुधारण्यास काही उपाययोजना केल्या, तर तो मुद्दादेखील सोन्याचा दर वाढण्यास मदत करणार आहे. अशा परिस्थितीत दिवाळीपर्यंत सोने ३२ हजारांचा पल्ला गाठेल, असा आमचा अंदाज असल्याचे कोठारी यांनी आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. अपुरा पाऊस, महागाई, अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता, यामुळे मध्यमवर्गाकडील शिल्लक उत्पन्नात घट झाली असून त्याचा परिणाम सोन्याची मागणी घटण्यात झाला आहे. यामुळे चालू आर्थिक वर्षात सोन्याची आयात ७०० टनांपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. सोन्याच्या एकूण मागणीपैकी ७० टक्के मागणी ग्रामीण भागाकडून असते; पण यंदा पाऊस कमी झाल्यामुळे ही मागणीदेखील घटणार आहे. सप्टेंबरनंतर लग्नसराईमुळे मागणीत थोडी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही; पण मागील वर्षाच्या तुलनेत यंदा सोन्याची मागणी ५० टक्के कमी असेल, असा अंदाजदेखील कोठारी यांनी व्यक्त केला आहे.